INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal

February - 2020 Special Issue – 240 (B)

# Analysis of Maharashtra State Legislative Assembly Election 2019



Executive Editors :
Dr. Sandip Tundurwar
(HoD, PG Dept. of Political Science)
Shri. Binzani City College, Nagpur

Dr. Vakil Shaikh
(HoD, Dept. of Political Science)
Taywade College, Mahadula-Koradi, Dist.-Nagpur

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Associate Editors :
Dr. Sanjay Nakade
(HoD, Dept. of Political Science)
Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon
Dr. Balasaheb Jogdand
(PG Dept. of Political Science)
Sitabai Arts & Commerce College, Akola
Dr. Amar Bondre
(Dept. of Political Science)
VMV Com. JMT Arts & JJP Sci. College, Nagpur
Dr. Dinkar Chaudhari
(HoD, Dept. of Political Science)
Arts & Commerce College, Bhisi

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625, | February-2020
Special Issue 240 (B) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषण : एक दृष्टीक्षेप | डॉ. राजेंद्र बेलोकार | 08 |
| 2 | निवडणूक आयोग आणि महाराष्ट्राची चौदावी विधानसभा निवडणुक विश्लेषण | महेंद्र भगत | 12 |
| 3 | विश्लेषण–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे | डॉ. संतोष डाखरे | 15 |
| 4 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : विश्लेषण व निरीक्षण | डॉ. आनंद शिंदे | 21 |
| 5 | विधानसभा निवडणूक – २०१९ एक विश्लेषण | डॉ. राजेश्री कडू, डॉ. अश्विनी खापरे | 27 |
| 6 | २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ | प्रा. कल्पना निंबार्ते | 31 |
| 7 | १४ वी विधानसभा निवडणूक : जनादेशाचा अन्वयार्थ | डॉ. अनंत आवटी | 36 |
| 8 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ ''खंडित जनादेश'' – विश्लेषण | डॉ. ममता पाथ्रीकर | 42 |
| 9 | १४ वी विधानसभा : खंडित जनादेश | डॉ. प्रशांत विघे | 46 |
| 10 | महाराष्ट्रातील विधानसभा सभेच्या निवडणूका व भवितव्य | प्रा. बबीता थुल | 51 |
| 11 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक – २०१९ मध्ये वंचित बहूजन आघाडी, डावे, दलित, शेकाप, जनसुराज्यपक्ष व ए.आय.एम.आय.एम. या पक्षाची कामगिरी | डॉ. छाया देशमुख | 58 |
| 12 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९ निवडणूक रणनीती आणि डावपेच | डॉ. संगिता सोमवंशी | 64 |
| 13 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ विश्लेषण राजकीय स्थित्यंतरे आणि रणनीती व डावपेच | डॉ. प्रफुल्ल राऊत | 67 |
| 14 | १४ व्या महाराष्ट्र विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रतिनीधीत्व | प्रा. शशिकांत पाटील | 72 |
| 15 | नव युवा आमदार आणि युवा मतदार : एक चिकित्सक अध्ययन (महाराष्ट्र विधानसभा २०१९ च्या संदर्भात) | डॉ. प्रतिभा टावरी | 79 |
| 16 | वंचित बहुजन आघाडी : वाटचाल व भवितव्य | डॉ. हिराचंद वेस्कडे | 85 |
| 17 | राजकीय पक्षांच्या उमेदवारीचे निकष आणि भूमिका | प्रा. विनोद मुडे | 89 |
| 18 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुका व राजकीय पक्षाची भूमिका | डॉ. राजेंद्र झाडे | 95 |
| 19 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : प्रमुख राजकीय पक्षांचे जाहीरनामे एक विवेचन | प्रा. एकनाथ मुरकुटे | 98 |
| 20 | निवडणुका आणि मतदारवर्तन | श्री. बंडु शेरके, डॉ. राजेंद्र मुद्दमवार | 103 |
| 21 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : कलम – ३५६ आणि राज्यपालाची भूमिका | डॉ. संदीप बी. काळे | 107 |
| 22 | राज्याच्या शांसन व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | डॉ. हरीदास लाडके | 112 |
| 23 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | राजेंद्र कुळमेथे | 114 |
| 24 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | प्रा. प्रभाकर डोळस | 122 |
| 25 | सत्तासंघर्षात मित्र–तत्व, जनमताचा बळी... | डॉ. बा. रा. कतुरवार | 124 |
| 26 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक | डॉ. सरला मेश्राम | 127 |
| 27 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषणात्मक विवेचन | डॉ. प्रिया बोचे | 130 |

# सत्तासंघर्षात मित्र–तत्व, जनमताचा बळी...

डॉ. बा. रा. कत्तुरवार
लोकप्रशासन विभागप्रमुख, लोकप्रशासन संशोधन केंद्रप्रमुख
देगलूर कॉलेज, देगलूर
लखपत्रेवार सुभाष गणपतराव, लोकप्रशासन संशोधन केंद्र, देगलूर कॉलेज, देगलूर

**प्रस्तावना :–**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 21 ऑक्टोबर 2019 रोजी पार पडली व तिचा निकाल 24 ऑक्टोबर 2019 रोजी अपेक्षित–अनपेक्षित असाच घोषित झाला. जे नाउमेद झालेले होते, जे खचलेले होते असे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातील नेते–कार्यकर्ते यांना अधिक प्रयत्न न करता मागील 2014 च्या निकालापेक्षा 2–3 जागा जास्तीच्या वाढून 44 जागा जिंकता आल्या म्हणून अनपेक्षित अशा निकालामुळे ते खूष! मागच्यावेळीपेक्षा यावेळी 13 जागा अधिकच्या (41 + 13 = 54) जिंकल्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस खूष! शिवसेना 124 जागा लढवून फक्त 56 जागा जिंकली म्हणून भाजपा खूष! तर भाजपला (105+) जागा जिंकुनही पूर्ण बहुमत मिळाले नाही म्हणून व इतर कुणाची तर मदत घ्यावीच लागेल म्हणून इतर सर्व पक्ष खूष. विशेषतः शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस खूष अशाप्रकारे सर्व प्रमुख राजकीय पक्षांना खूष करणारा निकाल पहिल्यांदाच पहायला मिळाला तेही ऐन दिवाळीच्या अगदी खुशी–खुशीच्या काळात...

**मित्र–तत्व बळी :–**

निवडणुका संपल्या, निकाल लागले, जनतेने भाजपा–शिवसेना व मित्रपक्ष अशा महायुतीला बहुमताचा आकडा (161+) देवून सत्तेची संधी दिली. परंतु सत्तेची लालसा सर्वांनाच! आमचं ठरलंय! आमचं ठरलंय! असं प्रत्येक मुलाखतीत सांगणारे भाजपा–शिवसेना नेते निकालानंतर मात्र, मुख्यमंत्री पदाबाबत आमचं असं ठरलंच नाही! आमचं असं ठरलयचं नव्हतं! असे म्हणत एकमेकाला शह–काटशह देण्याच्या प्रयत्नात महाराष्ट्रातील जनतेला दररोज एक नवीन राजकीय भूकंप अनुभवण्यास भाग पाडत होते. कधी नव्हे इतके राजकीय नाट्य, दररोज बदलणारी कथा–पटकथा मध्येच दुसरीकडे नेणारी कव्हरस्टोरी महाराष्ट्राच्या जनतेसह तमाम राज्यशास्त्र / लोकप्रशासनाचे अभ्यासक, विचारवंत, लेखक, समीक्षक इत्यादी सर्वांनी अनुभवली. शेवटी ज्या हिंदुत्त्व या तत्त्वावरून हे दोन्ही पक्ष अगदी 30 वर्षांपासून परंमित्र होते, ज्यांच्यात अभेद्य–मैत्री होती, ती या सत्तेच्या अप्सरेने क्षणात तोडली! येथे सत्ता जिंकली, पण तत्त्व हरले! इथे सत्ता मिळवली, पण मैत्री हरली! दोस्त दोस्त ना रहा... असेच झाले. आजपर्यंत ज्यांच्या विरोधात राण उठविले होते. ज्यांना संपविण्यासाठी आम्ही एकत्र आलो असे म्हणत होते, ज्यांची तत्त्व हे कधीही आमच्या तत्त्वांशी जुळणारे नाहीत, आम्ही त्यांच्यासोबत कधीच जाणार नाही. आम्ही प्रखर राष्ट्रअभिमानी, सावरकरांचे राष्ट्रप्रेमी, देशप्रेमी, हिंदुत्त्वाचे प्रखर पुरस्कर्ते... असे अनेक विशेषणे स्वतःला लावून घेणारे व कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस इत्यादीला भ्रष्टाचारी म्हणणारेच सत्तेसाठी मित्र–तत्त्व सोडून भ्रष्टाचाऱ्यासोबत जाण्यास क्षणात तयार होतात. तेंव्हा सामान्य नागरीकाला असा प्रश्न पडतो की, काय हे राजकारण? कुठे गेली यांची तत्त्वे? कुठे गेले यांचे हिंदूत्त्व? कुठे गेला यांचा स्वाभिमान? कसा विश्वास करावा यांच्या बोलण्यावर...?

जनमताचा बळी :–

महाराष्ट्राच्या जनतेने ज्याप्रमाणे 2019 च्या लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारला म्हणजेच भाजपा सरकारला केंद्रात बहुमताने निवडले. अगदी त्याचप्रमाणे भाजपा–शिवसेना या समविचारी पक्षांच्या महायुतीला महाराष्ट्रात बहुमत देवून त्यांना सत्ता स्थापनेसाठी जनादेश दिला होता. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता ही **"केंद्रात नरेंद्र तर राज्यात देवेंद्र"** असा नारा देत होती. म्हणजेच केंद्रात आणि राज्यात एकच सरकार असावे जेणेकरून महाराष्ट्राला केंद्राकडून मोठी मदत मिळेल व राज्यातील सरकार त्याच पक्षाचे असल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फायदा महाराष्ट्राच्या जनतेच्या विकासासाठी होईल, अनेक वर्षापासून निधी अभावी रखडलेल्या समस्या सोडविण्यासाठी होईल. अशी अपेक्षा बाळगून महाराष्ट्रातील जनतेने भाजपा–महायुतीचे सरकार (उमेदवार) बहुमताने निवडले होते व कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेसला पुन्हा एकदा सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता, परंतु येथे झाले भलतेच. जनतेने ज्यांची सत्ता नाकारली नेमके तेच सत्तेचे मानकरी ठरले व जनतेने ज्यांना एक नंबरचा पक्ष म्हणून स्वीकारले ते बिचारे विरोधी पक्षात बसले! हा तर जनतेच्या मताचा अपमान आहे! जनमताचा विश्वासघात आहे, असे बहुसंख्य लोकांना वाटत आहे. लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व असते हे जरी मान्य केले तरी जनतेने समविचारी तत्त्वाच्या भाजपा–शिवसेना महायुतीला बहुमत दिले होते. महाविकास आघाडी व्हावी म्हणून नव्हे...! बहुसंख्य जनतेला असे वाटत होते की, केंद्रात आणि राज्यात समविचारी पक्षाचे सरकार असावे म्हणून जनतेने तसा कौल दिला. परंतु **महाराष्ट्रात त्या–त्या तत्त्वशुन्य घराणेशाही राजकारणाने घराणेशाही जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील जनमताचा बळी दिला...! असेच म्हणावे लागेल.**

असे म्हटले जाते की, युद्धात आणि प्रेमात सर्वकाही माफ असते आणि राजकारण म्हणजे तर युद्धही असते आणि प्रेमही. कारण ज्याला पाडायचे आहे, जो विरोधक आहे, त्यांच्याशी राजकीय युद्ध, वाक्‌युद्ध, आरोप–प्रत्यारोप करायचे आणि सत्तेचे राजकारण येते तेंव्हा सत्तेसाठी शत्रुलाही जवळ करायचं, विरोधकांनाही जवळ करायचं, विरोधी विचारधारेच्या पक्षालाही, व्यक्तीलाही, जवळ करायचे तसेच त्यांचे चांगले गुण गायचे, त्यांच्या आतापर्यंतच्या काळातील एखाद्या चांगल्या निर्णयाचे तोंड भरून कौतुक करायचे, म्हणजेच प्रेमच होय, नाही का? म्हणूनच राजकारणात सर्व काही माफ असते, असे म्हटले जाते. तसेच राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रु किंवा मित्र नसतो. अत्यंत टोकाची, विरोधी विचारधारा असलेले, एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक म्हणून लोकमान्य असलेले, असे दोन व्यक्ती किंवा पक्ष सत्तेसाठी कधीही एकत्र येऊ शकतात हे सांगता येत नाही. आणि एकाच विचारधारेत वाढलेले, एकाच कुटुंबातील बाळकडू पिऊन मोठे झालेले किंवा एकच ध्येय किंवा तत्त्व ठेवून जन्मास आलेले, एकत्र राहिलेले, एकत्र वाढलेले पक्ष किंवा व्यक्ती देखील सत्तेसाठी मतभेद होवून केव्हांही दूर जातील व एकमेकांचे शत्रू होतील, विरोधक होतील हे सांगता येत नाही. हीच स्थिती महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणूक 2019 च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या तमाम जनतेने आश्चर्यकारकरित्या वरील प्रमाणे अनुभवलेली आहे.

सारांश :–

विधानसभा निवडणूक 2019 च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या जनतेने अनेक अचंबित करणारे अनुभव घेतलेले आहेत. **कोण? कधी? कोणाबरोबर जाईल हे फक्त गेल्यावरच कळलं!** परंतु महाराष्ट्राच्या जनतेला हे नक्की कळले आहे की, आपल्या मनात काहीही असो आपण मत कोणालाही देवो **आपण निवडलेले प्रतिनिधी तेच करतात, जे त्यांना फायदेशीर आहे, त्यांच्या पक्षांना फायद्याचे**

ISSN : 2348-7143
February-2020

आहे. इथे आता जनमताचा विचार केला जात नाही...! तत्त्वांचा विचार केला जात नाही...! तेंव्हा जनतेने आता 5 वर्षे जे जे होईल ते ते पहावे... असेच झाले आहे.

या विधानसभा निवडणुकीच्या निकालापासून ते सत्तास्थापनेच्या संघर्षापर्यंत एक गोष्ट लोकांना प्रकर्शाने जाणवली की, **नेते मंडळी जर सत्तेसाठी कधीही एक होत असतील किंवा दूर जात असतील तर आम्ही कशाला आमच्या गावपातळीवर, आमच्या गल्लीत, वार्डमध्ये एकमेकांना कायमचे शत्रू म्हणून पहावं?** ग्रामपंचायत, नगरपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका... इ. स्थनिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आम्ही सामान्य जनतेने कशाला आपला वैरभाव जपावा? वाढवावा? कशाला राजकीय वैरी समजून एकमेकांना पाण्यात पहावं? एकमेकांच्या विकास कामात, वैयक्तिक विकासात कशाला आडकाठी घालावी? एकमेकांना कायमचा शत्रू किंवा मित्र कशाला समजावे? शेवटी आपण एकाच गावात, गल्लीत एकत्र राहणार आहोत तेंव्हा एकत्र येवून चर्चेच्या माध्यमातून समस्या सोडविण्यातच, गावाच्या विकासाला प्राधान्य देण्यातच सर्वांचे हीत आहे अशी एक मोठी शिकवण या विधानसभा निवडणूक 2019 च्या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेने अनुभवलेली आहे.

तसेच दर पाच वर्षात निवडणुका होतात वेगवेगळ्या पक्षाचे सरकार येतात–जातात. महाराष्ट्रातील तरूणांना किंवा विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांना ही गोष्ट लक्षात आली असेल की, **ज्या नेत्यांच्या समर्थनात किंवा विरोधात आपण प्रचार करतो, राडा करतो, डोकी फोडून घेतो, पोलीस केस** होतात, एफ.आय.आर.होतात. **परंतु निवडणुकीनंतर मात्र ते नेते मंडळी सत्तेसाठी कधीही एक होतात.** तेव्हा आपण आपले कुटुंब, मित्रमंडळ, नातेवाईक, शेजारी व इतर समाजातील मंडळींसोबत प्रेमाने रहावे, त्यांच्याशी आपले संबंध बिघडणार नाहीत याची काळजी घ्यावी अशीपण शिकवण या विधानसभा निवडणुकीतून बऱ्याच तरूणांना व कार्यकर्त्यांना मिळाली असेल.

असो, महाराष्ट्रात आलेले महाविकासआघाडीचे सरकार भलेही हे वेगवेगळ्या विचारांच्या पक्षांनी मिळून बनलेले असले तरी त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेच्या विकासासाठी, येथील तरूणांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी, तसेच इतर अनेक महत्त्वाचे विकास कामे पार पाडण्यासाठी, एकविचाराने, एकमताने, एकदिलाने, एकध्येयाने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावे अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही. **मा.मुख्यमंत्री श्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे हे एक चांगलं, प्रामाणिक, सरळ व्यक्तिमत्त्व असून ते महाराष्ट्राला मुख्यमंत्र्याच्या रूपात लाभलं आहे.** तेंव्हा त्यांच्याकडून, त्यांच्या मंत्रिमंडळाकडून जनतेच्या खूप अपेक्षा आहेत. **एकंदरीत महाराष्ट्र सरकारकडून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे कार्य अविरतपणे होवो हीच आई जगदंबेचरणी प्रार्थना व या सरकारला मनःपूर्वक शुभेच्छा!**

जय हिंद...! ज्य महाराष्ट्र...!

**संदर्भ :–**

1. वर्तमानपत्रे, मासिके
2. www.google/wikipedia.com